**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# प्रगती

पळण्याचा मंत्र जपणा-या स्पर्धेच्या या युगात, 'पळा पळा कोण पुढे पळे तो' या उक्तीची आठवण तुम्हां-आम्हां सर्वांना सतत होत असते. शहरांतील माणसे तर सकाळपासून रात्रीपर्यंत कोणत्या ना कोणत्या कामासाठी पळतच असतात. संपूर्ण जगात आणि भारतातही शहरीकरणाची प्रक्रिया वेग घेत असून आता अनेकानेक गावे शहरे बनण्याच्या आणि शहरे अधिक विस्तारण्याच्या प्रक्रियेत आहेत. ही प्रक्रिया स्वाभाविकच म्हटली पाहिजे. माणसाच्या प्रगतीचेच हे टप्पे होय. प्रगतीमध्ये गती आहे, पुढे जाण्याची इच्छा, आंस आहे. तीही स्वाभाविकच! कारण, 'थांबला तो संपला'! शिकारीमागे धावणारा माणूस कधीतरी कंटाळून, थकून थांबला असता तर आपल्या अस्तित्वाची लढाई तो जिंकलाच नसता. ही लढाई कुणा एकाची नव्हती, कुणी एक दमला तर त्याची जागा दुसरा घेत होता, म्हणूनच मानवसमूह टिकले, वाढले आणि प्रगत झाले. रानोमाळ शिकार करीत भटकणा-या मानवसमूहांची आजची प्रगती आश्चर्यकारक अशीच आहे. पण गंमत अशी की इतकी प्रगती झाली तरी आपल्या प्रगतीचा इतिहास शोधण्याचे माणसाचे कुतूहल मात्र कायम आहे. या कुतूहलापोटी उत्क्रांतीच्या चर्चाविश्वात काही घडते आहे. नवे काही घडताना आवश्यक असलेले जुने काही बिघडत नाही, ही काळजी घेतली जाणे मात्र अपेक्षित असते. 'नवे घडले नाही' आणि 'होते ते जुनेही बिघडले', असे झाले तर मात्र गोंधळ वाढण्याचीच शक्यता असते. आफ्रिकेच्या एका टोकाला राहणा-या सहारावी नागरिकांच्या बाबतीत असा काहीसा गोंधळ झालेला दिसतो. 'ना स्वातंत्र्यात, ना पारतंत्र्यात' अशी काहीशी त्यांची स्थिती झाली आहे. आंतरराष्ट्रीय संस्थाही त्यांच्या पाठीशी आहेत, पण यातून बाहेर पडण्याचा मार्ग अद्याप त्यांच्यासाठी खुला झालेला नाही. स्वातंत्र्याची प्रकाशकिरणे कधीतरी आपले आयुष्य उजळवतील अशी त्यांची आशा आहे. सर्वच राष्ट्रे विकसनशील असणा-या आफ्रिकेत काही प्रयोगही घडत आहेत. खेड्यापाड्यांतील दुर्गम भागांतील नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ घेता यावा यासाठीचे हे प्रयोग माणसांच्या प्रगतीकडे जाणारेच आहेत.



माणसाने केलेली उत्तुंग प्रगती आता अशा टप्प्यावर पोहचते आहे की त्यामुळे त्याच्याच विनाशाच्या विहिरी खणल्या जात आहेत की काय अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे ती पर्यावरणाशी संबंधित विविध विषयांच्या तज्ज्ञांकडून. पृथ्वीचे वाढते तापमान आणि वातावरणातील बदल यांमुळे काय काय घडू शकेल याचे विविध अभ्यास पुढे येत आहेत. हे अभ्यास माणसाला सचिंत बनविणारे असेच आहेत. 'प्रगती हवी, विकास हवा पण विनाश नको', अशी भूमिका मान्य करायची म्हटली तरी जुने प्रश्न सुटत नाहीत. उलट, नवीन प्रश्न निर्माण होत आहेत, असे आढळते आहे. नेमका मार्ग कोणता, या प्रश्नाचे उत्तर मिळविणे सोपे नाहीच. या अभ्यासांतून योग्य तो बोध घेऊन माणसाने प्रगतीची दिशा ठरविणे योग्य ठरावे. प्रगतीसाठी, विकासासाठी धावणा-या माणसाचे प्रश्न बरेच गुंतागुंतीचे होत आहेत. इतकी प्रगती झाली तरी प्रगतीची, विकासाची फळे आमच्यापर्यंत पोहचलीच नाहीत, असे म्हणणारे विविध समाजगट विविध देशांमध्ये आहेतच. विकासाच्या प्रक्रियेतील उपेक्षेच्या मुद्यावरून वेगळ्या, स्वतंत्र राज्यांच्या मागणीने आपल्या देशात पुन्हा एकवार उचल घेतली आहे. तेलंगणाचा प्रश्न सध्या असाच धुमसताना दिसतो. प्रगतीशी निगडित अशा काही बाबींचा ऊहापोह 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात केला आहे. ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

विज्ञान

# पुन्हा एकदा चर्चा उत्क्रांतीची

अचंबा वाटावा अशा प्रगतीची उत्तुंग शिखरे पादाक्रांत करणा-या माणसाच्या मनात आजही आपल्या उत्क्रांतीबाबत कुतूहल आहे. डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धान्तानुसार माकडापासून माणूस उत्क्रांत झाला. या माणसाची पावले कुठल्या भूमीवर प्रथम उमटली असावी, याबाबतचा शोध अजूनही घेण्यात येत आहे. अलीकडे या शोधांमध्ये एक भर पडली आहे ती इस्रायलमधील संशोधनाची. तेथील उत्खननात सुमारे ४लाख ते २ लाख वर्षांपूर्वीच्या मानवाचे दात संशोधकांना सापडले आहेत. त्यावरून माणसाचे अस्तित्व सर्वप्रथम इस्रायलच्या भूमीवर असावे, असे म्हटले जात आहे. त्यामुळे आतापर्यंत मानला जात असलेला 'आऊट ऑफ आफ्रिका' हा सिद्धान्त मागे पडेल का, अशी चर्चा संबंधितांमध्ये होऊ लागली आहे. ही संपूर्ण चर्चा जाणून घेणे उद्बोधक आहे.

'आऊट ऑफ आफ्रिका' या सिद्धान्तानुसार मानवाचे पूर्वज (होमो इरेक्टस) आफ्रिकेतील आहेत. हा सिद्धान्त महत्त्वाचा मानला जातो; कारण, त्यामागे दोन वैज्ञानिक पुरावे आहेत. एक म्हणजे, आजच्या आधुनिक जनुकीय संशोधनांतून असे दिसून आले आहे की सर्व माणसांचा जनुकीय नकाशा हा ९९.९ टक्के सारखा असून तो आफ्रिकेतील प्राचीन मानवाकडून आजच्या मानवाला मिळालेला आहे. आफ्रिकेतून बाहेर पडलेल्या माणसांच्या जनुकांमध्ये कसकसे बदल होत गेले आहेत ते जनुकशास्त्रज्ञ डॉ. स्पेन्सर वेल्स यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते जनुकांमध्ये जो अल्पसा बदल होतो तो कायमस्वरूपी टिकतो व तो (जनुकीय संशोधनांच्या भाषेत) 'मार्कर्स' म्हणून कार्य करतो. उदाहरणार्थ, आफ्रिकेतून बाहेर पडलेल्या नागरिकांमध्ये 'एम-१६८' हे 'मार्कर' आढळते. युरेशियन नागरिकांमध्ये 'एम-९' हे 'मार्कर' दिसून येते. तर आशियातील नागरिकांमध्ये 'एम-३' हे 'मार्कर' आढळते.



जनुकांमधील सारखा असलेला ९९.९ टक्के भाग सोडला तर हे तीनही 'मार्कर्स' आफ्रिकेतील नागरिकांमध्ये आढळत नाहीत, म्हणजे स्थलांतरणानंतरच 'मार्कर्स' उत्क्रांत झाली असावीत, असे म्हणता येते. याचा अर्थ 'मार्कर्स' नसलेली आद्य जनुके ही आफ्रिकेतील नागरिकांकडूनच सर्व माणसांना मिळालेली असावीत, असे दिसते. दुसरे म्हणजे,'आऊट ऑफ आफ्रिका-दोन' या सिद्धान्तानुसार एक लाख वर्षांपूर्वीच्या सुज्ञ मानवाने - 'होमो सेपिअन्स'ने - आफ्रिकेबाहेर प्रथम स्थलांतर केले व काळाच्या ओघात तो जगभर स्थिरावला. या 'होमो सेपिअन्स'चे जीवाश्म आफ्रिकेत, इथिओपियातील ओमो किबिश येथे आढळले. पुढे ब-याच मोठ्या कालावधीनंतर, आफ्रिकेच्या बाहेर इस्रायल येथे सुमारे ९०हजार वर्षांपूर्वीचे मानवी अस्तित्वाचे काही पुरावे आढळले. या दोन बाबींमुळे 'आऊट ऑफ आफ्रिका' या सिद्धान्ताला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळाला असला तरी आफ्रिकेतून बाहेर पडलेला मानवसमूह कोणत्या मार्गाने, कोणत्या देशात व कधी पोहचला असावा, याबाबत मात्र मतभेद आहेत.

*'द अमेरिकन जर्नल ऑफ फिजिकल ॲथ्रपॉलजि'*मध्ये इस्रायलमधील नवे संशोधन प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यातील संशोधनपरलेखात तेलअव्हिव्ह विद्यापीठातील पुरातत्वसंशोधकांनी Qesem गुहांमध्ये ४लाख ते २लाख वर्षांपूर्वीच्या मानवांचे आठ दात सापडल्याचे म्हटले आहे. उत्क्रांतीच्या संशोधनांत प्रथमच इतके जुने मानवी अवशेष सापडले आहेत. त्यामुळे ही घटना महत्त्वपूर्ण ठरली आहे. हे दात 'होमो सेपिअन्स'चे आहेत किंवा कसे हे मात्र अद्याप नेमकेपणाने स्पष्ट नाही, असे या लेखाने म्हटले आहे. तरीदेखील त्यासंबंधीचे वृत्त प्रसिद्ध करताना ते दात 'होमो सेपिअन्स'चे असावेत असा निष्कर्ष वृत्त देणा-यांकडून काढण्यात आल्याने उत्क्रांतीविषयक चर्चाविश्व ढवळून निघाले. कारण, 'होमो सेपिअन्स' यांचे वास्तव्य जर इस्रायलमध्ये असते तर 'आऊट ऑफ आफ्रिका' हा सिद्धान्त मागे पडला असता. 'आऊट ऑफ आफ्रिका' या सिद्धान्तानुसार 'होमो सेपिअन्स'हे आफ्रिकेत होते व आफ्रिकेतून त्यांनी इतरत्र स्थलांतर केल्याचे स्पष्ट झाले आहे.

तथापि, हे संशोधन करणाऱ्या संशोधकांनी काही बाबी स्पष्ट केल्या आहेत. त्यांच्या मते हे दात 'होमो सेपिअन्स'चे आहेत किंवा कसे व इस्त्रायलमध्ये 'होमो सेपिअन्स'चे वास्तव्य होते किंवा कसे याबाबत नेमकेपणाने सांगता येत नाही. तसेच अशी शक्यता पूर्णपणे फेटाळताही येत नाही. कारण, हे संशोधन अद्याप पूर्ण झालेले नाही. उदाहरणार्थ, दातांमधील डी.एन.ए.चा अभ्यास झालेला नाही. तसेच ते मानवसमूह कशा प्रकारचा आहार घेत असतील या संबंधातही दातांवरून करण्यात येणारा अभ्यास झालेला नाही. कारण, प्रथम हे दात नीट जतन करण्याला प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे, विश्लेषणाच्या प्राथमिक टप्प्यात यापूर्वीच्या उपलब्ध माहितीबरोबर दातांचा आकार (shape) व झीज (wear pattern) या बाबी ताडून पाहण्यात आल्या. इस्त्रायलच्या उत्तरेकडील भागात असलेल्या Skhul आणि Qafzeh या गुहांमध्ये सापडलेल्या दातांशी ते जुळत असल्याचे आढळले. Skhul आणि Qafzeh या गुहांमधील दात सुमारे सव्वा लाख ते ८०हजार वर्षांपूर्वीचे आहेत. Qesem गुहा ४लाख ते २ लाख वर्षांपूर्वीच्या आहेत. मानवी उत्क्रांतीच्या संदर्भात त्या काळात जीवशास्त्रीयदृष्ट्या कसकसे बदल झाले हे समजून घेण्यासाठी हा काळ महत्त्वाचा ठरतो, असे संशोधकांना वाटते. शिकार करणे व ती वाटून घेणे, अग्नीचा वापर, दगडी हत्यारांचा वापर असे तत्कालीन व्यवहार जाणून घेण्यातही हा काळ उपयुक्त ठरतो.

गेल्या दशकापर्यंत 'आऊट ऑफ आफ्रिका' हा सिद्धान्त सर्वमान्य होता. पण सुमारे चार वर्षांपूर्वी 'सव्हानास्तान' हा नवीन पर्यायी सिद्धान्तही काही अभ्यासकांनी पुढे मांडला. त्यानुसार मानवाची उत्क्रांती आफ्रिका (इथिओपिया), पश्चिम आशिया (जॉर्जिया) आणि पूर्व आशिया (इंडोनेशिया) येथे साधारणपणे एकाच वेळी झाली असावी. संशोधकांच्या मते वातावरणातील बदलांचा मुद्दा येथे विचारात घेणे गरजेचे ठरते. कारण, वातावरण जसजसे थंड होत गेले तसतसे काही गवताळ प्रदेश तयार झाले, तर काही ठिकाणची झाडेझुडुपे वाळली. भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करता आशियात गवताळ प्रदेश वाढण्याची प्रक्रिया वेगाने झाली असावी, त्यामुळे या वेगाला सामावून घेणाऱ्या मानवसदृश प्रजाती आशियात निर्माण झाल्या असाव्यात. कारण, फार पूर्वी आफ्रिकेपासून आशियापर्यंतचा



विस्तीर्ण भाग हा कुरणांचा प्रदेश (गवताळ प्रदेश - सव्हानास्तान) होता. त्यामुळे या प्रदेशात माणसाने भटकंती केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.


दरम्यान, आफ्रिकेतून बाहेर पडलेल्या मानवाने कुठे कुठे स्थलांतर केले असेल याचा अभ्यास चालू आहेच. चीनमधील नव्या संशोधनानुसार आफ्रिकेतील मानवसमूह एक लाख वर्षांपूर्वी चीनमध्ये आले असल्याची शक्यता आहे. यापूर्वीच्या संशोधनानुसार आफ्रिकेतील मानवसमूह सुमारे ४० ते ५० हजार वर्षांपूर्वी चीनमध्ये आले होते. पण चीनमधील नवे संशोधन काही संशोधकांनी मान्य केलेले नाही. अन्य संशोधनांनुसार आफ्रिकेतील मानवसमूह सुमारे ७४ हजार वर्षांपूर्वी दक्षिण आशियात आले असण्याची शक्यता आहे. इंडोनेशियातील Toba ज्वालामुखीच्या उद्रेकाच्या आधी काही मानवसमूह या भागात वास्तव्य करून असावेत आणि त्या नंतरच्या काळात काही मोजके मानवसमूह वाचले आणि ते दक्षिण आशियात इतरत्र पसरले, असे म्हटले जाते. आफ्रिकेतून बाहेर पडलेले मानवसमूह 'पर्शियन गल्फ' भागातील मोठ्या भूप्रदेशात वास्तव्य करून असण्याची शक्यता एका संशोधनाने पुढे आणली आहे. हा भूप्रदेश आता पाण्याखाली गेला असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. या भागात मानवी वस्ती होती याचे पुरावे संशोधकांना अनपेक्षितपणे सापडले असून त्यात दगडांचा उपयोग करून बांधलेली घरे, नक्षीकाम केलेली भांडी व अन्य काही सामान मिळाले आहे. ही वस्ती साधारणपणे सात ते आठ हजार वर्षांपूर्वीची असावी, असा अंदाज आहे. पण हे मानवसमूह नाहीसे कसे झाले असतील, या प्रश्नाचा विचार करताना पृथ्वीवरील भूप्रदेश व समुद्र यांच्यात झालेले बदल लक्षात घ्यावे लागतात. त्या सर्व बाबींचा अभ्यास करून आता हा भूप्रदेश पाण्याखाली गेला असावा, असे मत संशोधक मांडतात.

मानवी उत्क्रांतीविषयक विविध संशोधने पुढे येत असली तरी इतक्या जुन्या काळातील बाबींचे पुरावे सापडणे कठीणच आहे. त्यामुळे काही संशोधने अपूर्णही राहू शकतात. असे असले तरी आपल्या उत्क्रांतीचे कुतूहल माणसाच्या मनात कायम असल्याने एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकातही उत्क्रांतीबाबत संशोधन व चर्चा चालूच आहे. ■■

राजकीय

# प्रश्न सहारावींचा सुटेल का ?

उत्तर आफ्रिकेतील सहारा वाळवंटाचा प्रदेश. जगप्रसिद्ध असलेल्या या वाळवंटाच्या पश्चिमेकडील भागात वसाहतवादामुळे निर्माण झालेल्या राजकीय प्रश्नाचे वादळ गेली ३५ वर्षे घोंगावते आहे. सहारावी हे तेथील स्थानिक नागरिक या वादळाला तोंड देत असतानाच वादळ केव्हा संपेल, याची प्रतीक्षा करीत आहेत. कारण, सहारावी नागरिकांच्या मते हा राजकीय प्रश्न त्यांचा स्वातंत्र्यलढा आहे. पूर्वी हा भूप्रदेश स्पेनच्या ताब्यात होता आता तो मोरोक्कोच्या ताब्यात आहे, असे दिसते. दरम्यान, तेथे उदयास आलेल्या स्वातंत्र्यवादी चळवळीने (Polisario) २८ फेब्रुवारी १९७६ रोजी 'सहारावी अरब डेमोक्रॅटिक रिपब्लिक' (SADR) स्थापन केले आहे. तेथे मोरोक्कोचे प्रशासन आहे की 'सहारावी अरब डेमोक्रॅटिक रिपब्लिक'चे या बाबतची स्पष्टता होत नाही. कारण, काही भाग 'सहारावी अरब डेमोक्रॅटिक रिपब्लिक'च्या ताब्यात आहे, पण सरकार विजनवासात




Map Source : Bethany World Prayer Center 1999
Used with permission from Adopt-A-People Clearinghouse

आहे. येत्या २८ रोजी 'सहारावी अरब डेमोक्रॅटिक रिपब्लिक'चा ३५ वा स्वातंत्र्यदिन आहे. पण, मोरोक्कोच्या ताब्यात असल्याने सहारावींची परिस्थिती 'ना स्वातंत्र्यात, ना पारतंत्र्यात' अशी झाली आहे.



आफ्रिकेतील ८१ राष्ट्रांनी 'सहारावी अरब डेमोक्रॅटिक रिपब्लिक'चे स्वतंत्र अस्तित्व मान्य केले आहे. तर २२ देशांनी आधी पाठिंबा देऊन नंतर तो मागे घेतला आहे आणि २५ देशांनी आपले राजकीय संबंध गोठविले आहेत. उत्तर आफ्रिकेच्या संदर्भातील आपले राजकीय हितसंबंध लक्षात घेऊन मोरोक्कोने या प्रांतावरील ताबा सोडावा यासाठी अमेरिकेनेही मोरोक्कोवर दबाव आणलेला नाही. फ्रान्सनेही असेच धोरण स्वीकारले आहे तर एकेकाळी या भूप्रदेशावर नियंत्रण असणा-या स्पेननेही या बाबतीत आता मौन पाळले आहे.

सहारावींच्या स्वातंत्र्यलढ्यामागील इतिहास येथे समजून घ्यावा लागतो. सहारावी ही सहारा वाळवंटातील एक भटकी-विमुक्त जमात. हे नागरिक मूरवंशीय असल्याचे म्हटले जाते. मूरवंशियातील एक उपगट बर्बर होय. सुमारे १३०० ते १६०० या काळात तेथे अरबांनी राज्य केले. त्या काळात अरब व बर्बर यांच्यात बरेच संघर्ष झाले होते. तेव्हापासून बर्बर, अरब आणि आफ्रिकी अशा तीन वंशियांचा प्रभाव तेथे राहिला आहे. १८८४च्या सुमारास या भूभागावर स्पेनने ताबा मिळविला. जागतिक पातळीवर वसाहतवादाची पीछेहाट झाली तरीदेखील सहाराचा हा भाग स्पॅनिशांच्या वर्चस्वाखाली होता. अखेरीस, स्पेनने सहारा भागावरील ताबा संपुष्टात आणावे असे आवाहन संयुक्त राष्ट्रसंघाने १९६५मध्ये केले. यानंतर Polisario या नावाची सहारावींची स्वातंत्र्याची चळवळ १९७३ मध्ये उदयास आली. या चळवळीत सहभागी झालेल्या सहारावींनी स्पॅनिशांविरुद्ध सशस्त्र संघर्ष केला. पण तरीही स्पॅनिशांनी ताबा सोडला नाही. मोरोक्को या शेजारच्या देशालाही या भूप्रदेशावर आपले वर्चस्व ठेवायचे होते. त्यामुळे मोरोक्कोच्या राजाने १९७५च्या नोव्हेंबरमध्ये सुमारे साडे तीन लाख सैनिक या प्रदेशात पाठविले. शेजारच्याच Mauritaniansनेदेखील या भागावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. १९७६ मध्ये स्पेनने हा भूभाग मोरोक्कोच्या आणि Mauritaniansच्या स्वाधीन केला. स्पॅनिशांच्या आधीपासून हा भाग मोरोक्कोचाच होता आणि तेथील नागरिकही मोरोक्कोच्या बाजूचेच होते, असे मोरोक्कोचे म्हणणे आहे. दरम्यान सहारावींची स्वातंत्र्याची चळवळ (Polisario) उदयास आली होती.

त्यामुळे या भागावर आपले नियंत्रण असावे यासाठी हा प्रश्न मोरोक्कोने आंतरराष्ट्रीय न्यायालयात नेला. पण स्पॅनिशांच्या ताब्यापूर्वी म्हणजे १८८४पूर्वी हा भाग आपला होता हे मोरोक्कोला पुराव्यानिशी सिद्ध करता आले नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय न्यायालयाने मोरोक्कोची भूमिका फेटाळली. त्याच वेळी तेथे Referendum (लोकमत/सार्वमत) घेण्यात यावे असा निर्णय न्यायालयाने दिला (सार्वमत नेमके कशासाठी हे मात्र उपलब्ध साहित्यावरून स्पष्ट झालेले नाही. पण स्वतंत्र राहायचे की मोरोक्कोबरोबर राहायचे हे ठरविण्यासाठी सार्वमत असावे, असे दिसते). १९७६मध्ये स्पेनने या भागातून माघार घेतल्यानंतर २८ फेब्रुवारी १९७६ रोजी 'सहारावी अरब डेमोक्रॅटिक रिपब्लिक'(SADR) स्थापन झाल्याचे Polisarioने स्पष्ट केले. त्यामुळे सहारावींचा मोरोक्को आणि Mauritanians विरुद्धचा लढा चालूच राहिला. १९७९मध्ये Mauritaniansने माघार घेतली आणि मोरोक्कोने पुन्हा तेथे ताबा मिळविला. तेव्हापासून तेथील सहारावींचे सरकार विजनवासात आहे. १९८१पासून १९८८पर्यंत Polisario आणि मोरोक्को यांच्यात बरेच संघर्ष झाले. त्या काळात युद्धाला कंटाळलेल्या सहारावी नागरिकांनी अल्जिरियाच्या सीमावर्ती भागात आश्रय घेतला. अखेरीस संयुक्त राष्ट्रसंघाच्या मध्यस्थीमुळे १९९१पासून तेथे युद्धबंदी आहे.

सहारावी नागरिकांचे सार्वमत घेण्यासाठीची प्रक्रिया १९९२मध्ये चालू करण्यात आली होती. पण त्या दृष्टीने पात्र नागरिक कोण हे ठरविण्यात अडचणी निर्माण झाल्या आणि सार्वमत घेण्यात आले नाही. या प्रकरणी उभयपक्ष दोषी असल्याचे मत व्यक्त करून संयुक्त राष्ट्रसंघाने मतदारांची नोंदणी करणे थांबविले. १९९७पर्यंत ही कोंडी फुटली नाही. मग १९९८मध्ये अमेरिकेच्या मदतीने चर्चा चालू झाली आणि त्याच वर्षी ७ डिसेंबर रोजी सार्वमत घेण्याचे ठरविण्यात आले. पण पुन्हा काही प्रश्न उद्‌भवले आणि सार्वमत घेण्याचा निर्णय स्थगित करण्यात आला. १९९९पासून आजपर्यंत हा प्रश्न 'जैसे थे'च राहिला आहे. दरम्यान, या भागातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आर्थिक व्यवहारांतून मोरोक्कोने भरपूर नफा मिळविला आहे. त्या तुलनेत अल्पसा खर्च करून मोरोक्कोने तेथे पायाभूत सोयीसुविधा निर्माण केल्या आहेत.



सार्वमताची प्रक्रिया न झाल्याने 'सहारावी अरब डेमोक्रॅटिक रिपब्लिक' व मोरोक्को यांच्यात आजही संघर्ष चालूच आहे. विशेषतः, गेल्या दोन वर्षांत मोरोक्कोकडून सहारावींवर होणा-या दडपशाहीच्या घटना वाढल्या आहेत. या घटनांची दखल 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल'ने घेतली आहे. दरम्यान, आपल्या न्याय्य हक्कांसाठी सहारावी नागरिकांनी उपोषणाचा मार्गही अवलंबिला होता. मोरोक्कोच्या तुरुंगात बंदिस्त असलेल्या सहारावी नागरिकांनी १८ मार्च २०१० रोजी उपोषणास सुरुवात केली. २९ दिवस हे उपोषण चालले. या उपोषणाची दखल जागतिक पातळीवर घेतली गेली. 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल,' 'ह्यूमन राइट्स् वॉच,' 'द रॉबर्ट केनेडी सेंटर फॉर जस्टिस अँड ह्यूमन राइट्स्,' 'द युनायटेड किंगडम् पार्लमेंटरी ह्यूमन राइट्स् ग्रुप' इत्यादींनी सहारावींना पाठिंबा दिला आहे.

स्पॅनिश लोकांच्या प्रभावामुळे सहारावींच्या जीवनशैलीत काही बदल घडून आले आहेत. स्पॅनिश भाषा तेथे महत्त्वाची असून स्पॅनिश व अरेबिक या दोन्ही 'सहारावी अरब डेमोक्रॅटिक रिपब्लिक' येथील अधिकृत भाषा आहेत. 'स्वातंत्र्य, लोकशाही आणि एकता' हे तेथील घोषवाक्य आहे. सहारा भागात अनेक शतकांपूर्वी इस्लामचा प्रवेश झाल्याने बहुतांश सहारावी हे इस्लामधर्मीय आहेत. अर्थात, भटक्या-विमुक्त जमातीची श्रद्धा/परंपरा त्यांनी काही प्रमाणात कायम ठेवली आहे. काही अभ्यासकांच्या मते ते Sidi Erbbi या देवाची पूजा करतात आणि इस्लामचे सहिष्णू रूप तेथे आढळते. या समाजाची लोकसंख्या सुमारे ५ लाख आहे. या समाजात जातिभेद व लिंगभेद आढळतो.

आज 'सहारावी अरब डेमोक्रॅटिक रिपब्लिक' अडचणीत आले आहे आणि सहारावींच्या मते हा प्रश्न फक्त सार्वमतानेच सुटू शकतो. पण सार्वमताबाबतची चर्चा पुढेच सरकत नाही, मग सार्वमत घेतले जाणार तरी कसे, असा प्रश्न निर्माण होतो. तर काहींच्या मते, सार्वमत घेतले तरी 'स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशात स्थान मिळवायचे की मोरोक्कोमध्ये विलीन व्हायचे,' या पेचात सहारावी नागरिक अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. केवळ वसाहतवादामुळे निर्माण झालेला हा प्रश्न चालू दशकात तरी सुटेल का, असा प्रश्न सहारावींच्या मनांत आहे. ■■

# अनोखा प्रयोग ‘सायकल-ॲम्ब्युलन्स्’चा

विकसनशील देशांमधील आरोग्यसेवा हा नेहमीच चिंतेचा आणि चर्चेचा विषय बनलेला असतो. त्यातही शहरी भागांमधील नागरिकांना विविध प्रकारच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध असतात पण ग्रामीण भागांतील आरोग्यसेवेची दैनाच असते, असे चित्र साधारणतः सर्वच विकसनशील देशांमध्ये आढळते. भारतही याला अपवाद नाही. आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजघटक, स्त्रिया आणि लहान मुलांची या बाबतीत अधिकच परवड होते. खास करून ग्रामीण भागांतील गर्भवती स्त्रियांच्या बाबतीत आरोग्याचा प्रश्न गंभीर बनतो कारण अडचणीच्या परिस्थितीत त्यांच्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध असतेच असे नाही. अशा वेळी वैद्यकीय सेवा पुरविणा-या आरोग्यकेंद्रापर्यंत लवकर पोहचणे त्यांना (वाहनाअभावी) शक्य होतेच असे नाही, प्रसंगी रुग्णांचा मृत्यूही संभवतो. त्यामुळे आरोग्यसेवेच्या संदर्भात रुग्णांची वाहतूक समस्या हा एक मोठाच प्रश्न ठरतो.



देशाच्या कानाकोप-यात आरोग्यसेवा पोहचली आहे किंवा कसे हे तपासून पाहण्याचा एक निर्देशक म्हणजे प्रसूतीच्या काळात होणारे माता व बालमृत्यू यांचे प्रमाण हे होय. विशेषतः, ‘सहस्रकाची विकास उद्दिष्टे’ (Millennium Development Goals) गाठण्याच्या चर्चेत हा विषय महत्त्वाचा ठरतो. उद्दिष्टे गाठण्यासाठी २०१५पर्यंतचा अवधी असून त्यासाठी संबंधितांकडून जोरदार प्रयत्न करण्यात येत आहेत. आफ्रिकेतील ‘सायकल-ॲम्ब्युलन्स्’चा अनोखा प्रयोग हा अशा प्रयत्नांमध्ये मोडता येईल. ‘सायकल-ॲम्ब्युलन्स्’ उपलब्ध झाल्याने गर्भवती महिलांना वैद्यकीय सेवा योग्य वेळी मिळाली, असे दिसून आले.



‘गरज ही शोधाची जननी असते,’ असे म्हटले जाते. ‘सायकल-ॲम्ब्युलन्स्’चा प्रयोग अशाच गरजेतून आकाराला आला. Transaid ही एक संस्था आहे. ग्रामीण भागांत आरोग्य, शिक्षण आणि अर्थार्जनाच्या संधी या संदर्भात विविध प्रकारचे अभ्यास व कार्य करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. या संस्थेने आफ्रिकेतील देशांमध्ये आरोग्यसेवाविषयक केलेल्या अभ्यासांतून असे दिसून आले की तेथील रुग्णांना वाहतुकीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भेडसावतो, पण तो दुर्लक्षिला गेला आहे. इथिओपियात केलेल्या एका सर्वेक्षणात असे आढळले की नजीकच्या आरोग्य केंद्रापर्यंत पोहचण्यासाठी दिवस भरलेल्या गर्भवती महिलांना सुमारे ११ तास लागतात. वाहतूकव्यवस्था उपलब्ध असणे आणि परवडणा-या दरात तिचा लाभ घेता येणे, या दोन बाबी तेथे महत्त्वाच्या ठरत होत्या.



त्या वेळी असेही लक्षात आले की तातडीच्या वेळी अगदी कमी अंतरासाठीदेखील वाहतूक व्यवस्थेवर होणारा खर्च हा आफ्रिकेतील कुटुंबांना सामान्यतः झेपणारा नाही. आर्थिक अडचणींमुळे आरोग्य सेवेचा लाभ घेण्यास तेथील नागरिकांना उशीर होतो. त्यामुळे प्रसंगी गर्भवती महिलांचे आरोग्य धोक्यात येते. झांबिया/मालावी सीमारेषेनजीकच्या खेड्यांत ‘सायकल-ॲम्ब्युलन्स्’चा उपयोग गर्भवती महिलांनी करण्याच्या घटना १८.५ टक्के इतक्या होत्या तर मलेरियाच्या रुग्णांसाठी हे प्रमाण ३० टक्के इतके होते. झांबियाच्या पूर्व भागांतील नागरिकांची तेव्हाची तातडीची गरज लक्षात घेऊन २००८साली Transaidतर्फे ४० ‘सायकल-ॲम्ब्युलन्स्’चा उपक्रम राबविण्यात आला होता. तेव्हा Transaidची तीन उद्दिष्टे होती -

(१) आरोग्यसेवेचा ‘ॲक्सेस’ नागरिकांना मिळावा,

(२) ‘सायकल-ॲम्ब्युलन्स्’ तयार करणे व तिची देखभाल करणे यासाठी नागरिकांच्या क्षमता विकसित होणे (अर्थात, त्यांच्याजवळ सायकल असणे वा आर्थिक साहाय्याने त्यांनी सायकल विकत घेणे हे अपेक्षित होते),

(३) ग्रामीण भागातील आरोग्यसेवेच्या संदर्भात अभ्यास-प्रयोग करून त्याची माहिती आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणा-या संस्थापर्यंत पोहचविणे.

यांपैकी पहिले उद्दिष्ट गाठण्यात Transaid यशस्वी झाली आहे. झांबियाच्या पूर्व भागांतील Petauke, Chipata आणि Katete या तीन जिल्ह्यांत हा प्रयोग राबविण्यात आला. तेव्हा, रुग्णांची देखभाल करणा-या आरोग्यसेवकांपैकी सुमारे ९६टक्के आरोग्यसेवकांना 'सायकल-ॲम्ब्युलन्स्'चा उपयोग झाला. ही सेवा उपलब्ध झाल्यानंतर त्याचा वापर कसा होतो याच्या नोंदी ठेवण्यात आल्या. तेव्हा या सेवेचा उपयोग करून रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळण्याच्या एकूण ८२ घटना ४ महिन्याच्या कालावधीत घडल्याचे दिसून आले. 'सायकल-ॲम्ब्युलन्स्'चा उपयोग केलेल्या स्वयंसेवकांच्या मते, ८६ टक्के घटनांमध्ये रुग्णांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली होती, पण 'सायकल-ॲम्ब्युलन्स्'मुळे त्यांचे प्राण वाचले. अभ्यासासाठी ठेवलेल्या नोंदीनुसार 'सायकल-ॲम्ब्युलन्स्' उपलब्ध होत्या म्हणून सहा महिन्यांच्या कालावधीत ७० रुग्णांचे प्राण वाचले.

'सायकल-ॲम्ब्युलन्स्' द्वारे केलेल्या ७१ खेपा या योग्य कारणासाठी करण्यात आलेल्या होत्या. २० टक्के घटनांमध्ये मलेरियाच्या रुग्णांसाठी आणि १७ टक्के घटनांमध्ये गर्भवती महिलांसाठी 'सायकल-ॲम्ब्युलन्स्'चा उपयोग करण्यात आला. 'सायकल-ॲम्ब्युलन्स्'ची सर्वांत जास्त अंतराची खेप ही २८ किलोमीटरची होती. यापूर्वी ग्रामीण भागांतील आरोग्य केंद्रापर्यंत बैलगाडीतून रुग्णांचा प्रवास व्हायचा तेव्हा अडीच ते तीन किलोमीटर अंतर जाण्यासाठी दोन ते तीन तास लागायचे. तसेच बैलांना शेतीच्या कामात जुंपण्यात आले असले तर शेतातून बैलांना घरापर्यंत पोहचण्यासही वेळ लागायचा. आता हाताशी 'सायकल-ॲम्ब्युलन्स्' असल्या तर तो वेळ वाचतो. शिवाय एखादी महिलाही 'सायकल-ॲम्ब्युलन्स्' सहजपणे चालवू शकते. 'सायकल-ॲम्ब्युलन्स्'चा सर्वांत मोठा फायदा असा की त्या वस्तीवरच ठेवता येतात. त्यामुळे त्या कुणालाही चटकन उपलब्ध होऊ शकतात. सरकारी वाहन असले तर ते आरोग्य केंद्रातच असते आणि तेथून ते रुग्णांपर्यंत पोहचण्यासाठी वेळ लागू शकतो. वाटेत ओढा वा छोटा पूल आल्यास 'सायकल-ॲम्ब्युलन्स्'मध्ये असलेले स्ट्रेचर काढताही येते.



'सायकल-ॲम्ब्युलन्स्'चा उपयोग केल्यानंतर काही अडचणी लक्षात आल्या आणि वापरणा-यांनी त्याबाबत काही सूचनाही केल्या. त्या अशा - (१) 'सायकल-ॲम्ब्युलन्स्'मधील सायकल ही अन्य कोणत्या कामांसाठी वापरण्यात येऊ नये (२) फक्त रुग्णांची ने-आण करतानाच तिचा वापर व्हावा, म्हणजे मोजकाच वापर झाल्याने तिचा देखभालखर्च कमी होईल तसेच दुरुस्तीसाठी आवश्यक ते सामान व रेनकोट त्यात असावा. (३) रात्री-अपरात्री रुग्णाला आरोग्य केंद्रापर्यंत नेण्याची वेळ आल्यास 'सायकल-ॲम्ब्युलन्स्'च्या समोरच्या व मागच्या बाजूला दिवा असणे गरजेचे आहे (४) सायकल आणि सायकलला जोडला जाणारा रुग्णासाठी असलेला भाग हे दोन भाग अशा प्रकारे जोडले जावेत की त्यामुळे वळताना सायकलस्वाराला अडचणीचे होऊ नये.

रुग्णाची वाहतूक अधिक चांगली व वेगाने व्हावी यासाठी 'सायकल-ॲम्ब्युलन्स्' च्या धर्तीवर 'मोटरसायकल-ॲम्ब्युलन्स्'चा ही प्रयोग करून पाहण्यात आला आहे. नायजेरियातील Partnership for Trans-forming Health Systems साठी Transaid ने हा प्रयोग राबविला. तेव्हा स्थानिक पातळीवर ॲम्ब्युलन्स् बनविण्यात आली आणि ती मोटरसायकलला जोडण्यात आली होती.


मोटरसायकल-ॲम्ब्युलन्स्

आरोग्य केंद्रापर्यंत पोहचण्यासाठी रुग्णाच्या दृष्टीने होणारी वेळेची बचत ही येथे महत्त्वाची ठरली. पण, 'मोटरसायकल-ॲम्ब्युलन्स्'च्या देखभाल-दुरुस्तीसाठी होणा-या खर्चाचा विचार येथे करावा लागतो. सरकारकडून मिळणा-या निधीबाबत होऊ शकणारा विलंब लक्षात घेता असा निधी (community-managed emergency loan funds -ELF) काही प्रमाणात तरी स्थानिकांकडूनच उभा करता येईल का, असाही विचार याबाबत मांडण्यात आला आहे.

***(पृष्ठ २० वर पाहावे)***

## जिकडेतिकडे

# वातावरणातील बदल शहरांच्या मुळांवर...?

चालू शतकात महत्त्वाचा आणि काळजीचा ठरत असलेला एक मुद्दा आहे वातावरणातील बदलांचा. या बदलांचा भार पृथ्वीला कसा सोसवेल, याबाबतचे अभ्यास-संशोधन जगभरात चालू आहे. वातावरणातील बदलांमुळे पृथ्वीचे तापमान वाढत असून बर्फाळ प्रदेशातील बर्फ वितळून समुद्राच्या पाण्याच्या पातळीत वाढ होत असल्याचे दिसून आले आहे. शिवाय, या प्रक्रियेत भूपृष्ठाखाली असणारे 'परमाफ्रॉस्ट'चे अस्तरही विरळ होत आहे. हिमाने आच्छादलेल्या उत्तर ध्रुवीय प्रदेशात गोठलेल्या बर्फाचा दाट असा पापुद्रा जमिनीच्या पोटात तयार झालेला असतो. हा पापुद्रा हे जणू गोठीव बर्फाचे अस्तरच असते. यालाच 'परमाफ्रॉस्ट' असे संबोधले जाते. या दोन्ही बाबींचा परिणाम होऊन उच्च पर्वतरांगा असलेल्या भागांत दरडी आणि बर्फाचे कडे कोसळण्याच्या तसेच जमीन सरकण्याच्या-दुभंगण्याच्या घटना अलीकडच्या काळात वाढल्या आहेत.


बर्फाखाली दडलेल्या kras heninnikov या ज्वालामुखीच्या शिखराकडील भाग

काही अभ्यासकांच्या मते या घटना या एकप्रकारे पूर्वसूचना आहेत. हे असेच चालू राहिले तर अजूनही काही भयानक घडू शकते. म्हणजे, समजा बर्फाचे थर असेच वितळत गेले तर बर्फाखाली दडलेल्या ज्वालामुखीच्या शिखराकडील निमुळता भाग (summit cones) अस्थिर होण्याची शक्यता असून त्यामुळे अशा घटना अधिक प्रमाणावर घडतील. त्यामुळे अमेरिकेतील व अन्य देशांतील काही शहरे भुईसपाट होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.



वस्तुतः, दरडी आणि बर्फाचे कडे कोसळण्याच्या घटना पृथ्वीसाठी नवीन नाहीत. यापूर्वीही असे घडले आहे. काही अभ्यासांमधून असे दिसून आले आहे की सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी काही summit cones अस्थिर झाल्याने ते कोसळून मोठ्या प्रमाणावर दरडी कोसळल्या होत्या. पण हिमयुगाचा तो शेवटचा टप्पा होता आणि पृथ्वीवरील मनुष्यवस्ती एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढलेली नव्हती. असे परत घडण्याची शक्यता आहे किंवा कसे याचा विशेष अभ्यास पर्यावरणविषयक संस्थाकडून करण्यात येत आहे. याचा एक भाग म्हणून चिली या देशामधील Planchon-Peteroa या भागातील बर्फाच्छादित ज्वालामुखीबाबत अभ्यास चालू आहे. भौगोलिक स्थान लक्षात घेता पर्यावरणातील बदलांचा परिणाम या ज्वालामुखीवर लवकर दिसून येऊ शकतो, असे अभ्यासकांना वाटते म्हणून या ज्वालामुखीची निवड त्यांनी अभ्यासासाठी केली आहे. अभ्यासकांना असे लक्षात आले की सुमारे ११ हजार वर्षांपूर्वी या भागातील सुमारे एक तृतीयांश summit cones वरील बर्फ वितळून फार मोठे कडे व खडक पर्वतांवरून कोसळले आणि त्यांच्यामुळे पृथ्वीवरील ३७० चौरस किलोमीटर जागा व्यापली गेली. या भागांत कितीही जोराचा पाऊस पडला तरी असे घडण्याची शक्यता त्यांना वाटत नाही. बर्फाचे कडे वितळल्यानेच असे घडू शकते, असा अभ्यासकांचा कयास आहे.

पृथ्वीचे तापमान अलीकडच्या काळात वाढत असल्याने वरील इतिहासाची पुनरावृत्ती होण्याचा धोका आहे आणि असे संपूर्ण जगभरात घडू शकते. अनेकानेक ज्वालामुखींच्या बाबतीत असे घडणे धोकादायक ठरू शकते, असे संशोधकांना वाटते. कारण, अशा ज्वालामुखींच्या परिसरातील वस्ती आता फार मोठ्या प्रमाणात वाढली आहे. Andes भागातील ज्वालामुखीला याचा पहिला फटका बसू शकतो. कारण, जागतिक तापमानवाढीमुळे या भागातील तापमान अपेक्षेपेक्षा अधिक वेगाने वाढते आहे. या भागात जर विपरीत घटना घडली तर इतरत्रही तसे घडू शकेल याची ती एकप्रकारे पूर्वसूचनाच ठरेल. ऑक्सफर्ड विद्यापीठातील या विषयाचे तज्ज्ञ (volcanologist) हे या मताला दुजोरा देतात. Andes भागातील ही शक्यता हा एक मोठा धोकाच असल्याचे त्यांचे मत आहे.

दरम्यान, ब्रिटनमध्येही याबाबत अभ्यास-संशोधन चालू आहे. अभ्यासक BillMcGuire आणि Rachel Lowe यांच्या अभ्यासांतून असे दिसून येत आहे की, अशा घटनांच्या संदर्भात बर्फाच्छादित नसलेले ज्वालामुखीदेखील धोकादायकच ठरू शकतात. कारण, पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे काही ठिकाणी अतिवृष्टी होऊ शकते आणि अतिवृष्टीमुळे दरडी कोसळण्याच्या शक्यता वाढतात. अभ्यासकांच्या मते ज्वालामुखीमुळे अडचणीत येऊ शकणारी जगभरातील (अमेरिका,जपान, दक्षिण अमेरिका इत्यादी देशांमधील) अशी किमान ३९ शहरे आहेत. इतिहासात ज्या ज्वालामुखींबाबत असे घडले आहे, त्या ज्वालामुखीपासून सुमारे १०० किलोमीटर परिसरात काही शहरे आहेत. त्यामुळे ही शहरे भुईसपाट होण्याचा धोका अधिक आहे. पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे आणि पर्यावरणातील बदलांमुळे मानवी जीवनावर कसकसे परिणाम होऊ शकतात हे सांगणारे अभ्यास मानवाला पर्यावरण रक्षणाची कृती करण्यास बाध्य करतील अशी आशा बाळगावी का? ■■


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे प्रकाशन**

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

**कर्ता-करविता**

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

(दुसरी आवृत्ती प्रकाशित)

मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रुपये**





*(पृष्ठ १६ वरून)*


'मोटरसायकल-ॲम्ब्युलन्स्'च्या प्रयोगात भाग घेतलेल्या ३६ खेड्यांपैकी फक्त ४ खेड्यांमध्ये स्थानिकांनी एकत्र येऊन काही प्रमाणात असा निधी (ELF) उभा केला. अशा प्रयोगांची माहिती नागरिकांना नीटपणे समजावून सांगितली तर ते यात सहभागी होण्याच्या शक्यता वाढतील, असे मत हा उपक्रम राबविणारे तज्ज्ञ व्यक्त करतात.

अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागांतील नागरिकांच्या आरोग्यविषयक सोयीसुविधांच्या संदर्भातील वाहतुकीचा प्रश्न काही प्रमाणात तरी मार्गी लागेल, असे दिसते. पण, एक वा दोन प्रयोगांवरून कोणत्याही निष्कर्षाप्रत येणे कठीण आहे. म्हणून असे प्रयोग अधिक प्रमाणात व्हायला हवेत. तसेच या प्रयोगांबाबतच्या सर्व प्रकारच्या नोंदीदेखील ठेवण्यात आल्या पाहिजेत. मग त्यावरून हा प्रश्न सोडविण्यासाठी आणखी काय करता येईल ते स्पष्ट होऊ शकेल. असे संबंधितांना वाटते. असे प्रयोग अन्य देशांतही व्हावेत अशी अपेक्षा करता येईल. ■■

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## इतिहास वेगळ्या तेलंगणाच्या मागणीचा...

आंध्र प्रदेशात सध्याचीच परिस्थिती राहू द्यावी अशा प्रकारची भावना व्यक्त करीत असतानाच राज्याच्या विभाजनासंदर्भातील विविध असे सहा पर्याय सुचविणारा अहवाल निवृत्त न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ३० डिसेंबर २०१० रोजी सादर केल्यामुळे स्वतंत्र तेलंगण राज्याच्या मागणीचा प्रश्न एका नवीन टप्प्यावर येऊन ठेपलेला आहे. तत्पूर्वी, स्वतंत्र तेलंगण राज्याच्या निर्मितीची प्रक्रिया सुरू करण्यात येत असल्याबाबतची घोषणा केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी ९ डिसेंबर २००९ रोजी केली आणि आंध्र प्रदेशात पुन्हा एकवार अस्थिरतेचे, अशांततेचे पर्व चालू झाले. तेलंगण राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष के. चंद्रशेखर राव यांनी २००९ सालातील डिसेंबर महिन्याच्या पूर्वार्धात आरंभलेल्या उपोषणाच्या दबावाखाली येऊन केंद्र सरकारने ती घोषणा केल्याची टीका त्या वेळी करण्यात आली होती. त्या नंतर, वेगळ्या तेलंगण राज्याची शक्यता व सुसाध्यता (Feasibility) आजमावून पाहण्यासाठी निवृत्त न्या. श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.

---

*‘पुन्हा एकवार राज्य पुनर्रचना ?’ या बीजविषयावरील एक परिसंवाद भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये २७ व २८ ऑगस्ट २०१० अशा दोन दिवशी आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादादरम्यान झालेल्या चर्चेचा तपशील ‘अर्थबोधपत्रिके’च्या वाचकांसाठी सादर करण्याचा प्रयत्न आहे. त्यानुसार, ऑक्टोबर २०१० (संपूर्ण अंक) तसेच डिसेंबर २०१० आणि जानेवारी २०११च्या अंकांत चर्चेचा वृत्तांत पुरवणीच्या रूपाने सादर करण्यात आला होता. त्याच विचारविमर्शाचा हा पुढील भाग.* ■ *संपादक*



तेलंगण प्रांताला स्वतंत्र राज्याचा दर्जा बहाल करण्यात यावा, ही मागणी थेट आंध्र प्रदेश राज्याच्या निर्मितीपासूनची आहे. स्वातंत्र्यानंतर १९५३ साली स्थापन करण्यात आलेल्या पहिल्या राज्य पुनर्रचना आयोगाच्यासमोरही स्वतंत्र अशा तेलंगण राज्याची निर्मिती करण्याचा प्रस्ताव होताच. तेलुगू ही तेलंगण आणि उर्वरित आंध्र प्रदेश या दोन्ही प्रदेशांची समान भाषा असली तरी तेलंगणाचा समावेश आंध्र प्रदेशात लगोलग करण्याबाबत पहिला राज्य पुनर्रचना आयोग सुरुवातीस अनुकूल नव्हता. आयोगाच्या निरीक्षणानुसार, तेलंगण प्रांताचा समावेश असलेले एकच मोठे भौगोलिक एकक राज्य या स्वरूपात अस्तित्त्वात यावे, यांबाबत आंध्रात मात्र त्या वेळी अनुकूलता दिसून येत होती. तेलुगू भाषिकांचे एकच एक राज्य निर्माण व्हावे, अशा प्रकारची लोकभावना तत्कालीन आंध्रात वसत होती. या संदर्भात तेलंगण प्रांतातील लोकभावना मात्र त्या वेळी तितकीशी स्पष्ट झालेली नव्हती. तेलंगण प्रांताचा अंतर्भाव आंध्र प्रदेश राज्यात करण्यात यावा, यांबाबत आंध्र प्रदेशातील तत्कालीन वजनदार नेतृत्वाकडून अनुकूल मत प्रदर्शित केले जात असले तरी तेलंगणाचे असे सामिलीकरण हे निखळ ऐच्छिक आणि तेलंगणातील लोकेच्छेनुसारच घडावे, अशी त्यांची भावना होती. आपल्या भविष्याबाबतचा निर्णय तेलंगणातील रहिवाशांनीच घ्यावा, अशी तत्कालीन आंध्र प्रदेशातील लोकाग्रणींची भावना होती.

तेलंगणाचे स्वतंत्र राज्य अस्तित्त्वात यावे, अशा प्रकारची सशर्त शिफारस पहिल्या राज्य पुनर्रचना आयोगाने १९५५ साली सादर केलेल्या आपल्या अहवालात केली. १९६१ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तेलंगणाचे एकत्रीकरण आंध्र प्रदेशाबरोबर घडवून आणावे, अशी तरतूद आयोगाने सुचविली होती. मात्र, तशा आशयाचा ठराव तेलंगण राज्याच्या विधानसभेत दोन तृतीयांश बहुमतानिशी मंजूर केला जावा, असेही आयोगाने नमूद करून ठेवले. तेलंगणाच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्याबाबतच्या सामंजस्य करारांवर स्वाक्ष-या झाल्यानंतर आंध्रच्या किनारपट्टीचा प्रदेश, रायलसीमा आणि तेलंगण या तीन प्रांतांचा समावेश असलेले आंध्र प्रदेश हे राज्य १ नोव्हेंबर १९५६ रोजी अस्तित्त्वात आले.

### तेलंगणवासियांच्या मनातील धास्ती

आंध्र प्रदेशच्या अन्य दोन प्रांतांच्या तुलनेत तेलंगणाचा प्रांत विकासाच्या प्रक्रियेत पिछाडीवर राहिलेला असला तरी या प्रांताचा महसुली पाया अन्य दोन विभागांपेक्षा विस्तृत होता. आंध्र प्रदेशात सामिलीकरण झाल्याने महसुलाचा हा प्रवाह अन्य विभागांकडेच वळविला जाईल, अशी भीती तेलंगणवासियांना होती. तसेच, कृष्णा आणि गोदावरी या दोन नद्यांवरील सिंचन प्रकल्पांचा लाभही उर्वरित आंध्रातील विभागांनाच बव्हंशी मिळेल अशी साशंकताही त्यांच्या मनात होतीच. शिवाय, ब्रिटिशांच्या अमदानीत उच्च शिक्षणाचे लाभ पदरात पाडून घेतलेले आंध्रवासी शिक्षण तसेच सरकारी नोकरीच्या संधी पदरात पाडून घेण्याच्याबाबतीतही आपल्यावर कुरघोडी करतील, अशीही धास्ती तेलंगणातील नागरिकांना आंध्र प्रदेशच्या निर्मितीच्यावेळी वाटत होती. तेलंगणातील रयतेच्या मनातील ही भावना ध्यानात घेऊनच, सार्वजनिक खर्च, सिंचन, सरकारी नोक-या, अर्थसंकल्पीय तरतुदी अशांसारख्या बाबींसंदर्भात तेलंगणावर अन्याय होणार नाही, अशा आशयाचा करार आंध्राच्या निर्मितीच्या वेळी स्वाक्ष-यांकित करण्यात आला.

परंतु, आंध्र प्रदेशच्या निर्मितीच्या वेळी १९५६ साली करण्यात आलेल्या या करारातील अनेक अटींचे पालन होत नसल्याची खंत तेलंगणातील नागरिकांच्या मनात उत्तरोत्तर दृढ होत गेली. सरकारी निधीच्या खर्चात तेलंगणाचा रास्त हिस्सा जपण्याबाबत दुजाभाव, सरकारी नोक-या, शिक्षण तसेच सिंचन सुविधांच्या निर्मितीसंदर्भात आपल्या प्रांतावर अन्याय केला जात असल्याच्या भावनेतून तेलंगणातील सर्वसामान्यांमध्ये असमाधान दाटत होते. अखेर, या करारातील बहुतेक तरतुदींची मुदत उलटून जाण्याची घडी १९६९ साली येऊन ठेपली त्या वेळी या कराराची मुदत आणखी वाढविण्यात यावी या मुद्द्यावरून आंदोलन छेडले गेले. उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थी त्यात आघाडीवर होते. आंध्र प्रदेशच्याच जोडीने आणखी एका तेलुगूभाषिक राज्याची निर्मिती करण्यास काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाचा विरोध होता. पक्षनेतृत्त्वाची ही भूमिका ज्ञात असल्यामुळेच चेन्ना रेड्डी यांनी काँग्रेस पक्षातून फुटून निघत 'तेलंगण प्रजा समिती' या राजकीय पक्षाची १९६९ साली स्थापना केली.



### 'तेलंगणा सरप्लस'चे मोजमाप

आंध्राच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या विनंतीवरून देशाच्या महालेखापालांनी १९६९ सालातील जानेवारी महिन्यात एक स्वतंत्र चौकशी समिती नियुक्त केली. १ नोव्हेंबर १९५६ या दिवशी आंध्र प्रदेश राज्य स्थापन झाल्यापासून ते ३१ मार्च १९६८ या कालावधीदरम्यान तेलंगणाच्या खात्यावर किती वित्तीय आधिक्य (तेलंगणा सरप्लस) जमा झालेला आहे, याचे मोजमाप करण्याचे काम या समितीकडे सोपविण्यात आले होते. या आधिक्याची व्याख्याही सुस्पष्टपणे करण्यात आली होती. विविध बाबींवर सार्वजनिक निधीची जी मात्रा तेलंगण प्रांतात खर्च होणे अपेक्षित होते ती मात्रा आणि प्रत्यक्षात खर्च झालेली रक्कम यांतील तफावत म्हणजे हे 'सरप्लस' असणार होते. या मोजमापासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांची निश्चिती त्यासाठी १९ जानेवारी १९६९ या दिवशी बोलविण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीदरम्यान करण्यात आली होती. १९६९ सालच्या मार्च महिन्यात या समितीने आपला अहवाल सादर केला.

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

दरम्यान, तेलंगणात उसळलेला व्यापक स्तरावरील जनक्षोभ ध्यानात घेऊन १९६९ सालच्याच एप्रिल महिन्यात केंद्र सरकारने आणखी एका उच्चाधिकार समितीची स्थापना केली. १ नोव्हेंबर १९५६ ते ३१ मार्च १९६८ याच कालावधीदरम्यानचे तेलंगणासाठीचे वित्तीय आधिक्य निश्चित करण्याची जबाबदारी या समितीकडे सोपविण्यात आली होती. तसेच, या 'तेलंगणा सरप्लस'चे मोजमाप भविष्यातही करता यावे या दृष्टीने मोजमापासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्याचे कामही याच समितीच्या कार्यकक्षेत अंतर्भूत करण्यात आले होते. परंतु गंमत अशी दिसते की, आंध्र प्रदेश राज्याच्या एकंदर जमा-खर्चाचे वितरण तेलंगण आणि उर्वरित आंध्र प्रदेश या दोन भूभागांमध्ये करण्याबाबतच्या निकषांसंदर्भात आंध्र प्रदेश सरकार आणि तेलंगणातील विधानसभा सदस्यांचा अंतर्भाव असलेली तेलंगण प्रांतिक समिती यांच्यादरम्यान तीव्र स्वरूपाचे मतभेद नांदताना दिसतात. या संदर्भात आजवर जे जे करारमदार झाले त्यांचे पालन आंध्र प्रदेश सरकार वा तेलंगणातील नेतृत्त्व यांपैकी कोणाहीकडून काटेकोरपणे झालेले अनुभवास येत नाही. सार्वजनिक खर्चाच्या वाटपाबाबतच्या निकषांमध्ये उभय बाजूंकडून वेळोवेळी बदलही घडवून आणले गेलेले दिसतात.

लोकसभेसाठी १९७१ सालच्या मे महिन्यात झालेल्या निवडणुकीदरम्यान तेलंगण प्रजा समितीने तेलंगणातील लोकसभेच्या १४ जागांपैकी १० जागा जिंकल्या. परंतु, तेलंगणाच्या स्वतंत्र राज्याची निर्मिती करण्यास तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा असणार ठाम विरोध ध्यानात येताच नवस्थापित तेलंगण प्रजा समिती या पक्षाच्या नेतृत्त्वापैकी काहीजण पुन्हा काँग्रेस पक्षात प्रवेश करते झाले. तेलंगण राज्यनिर्मितीला विरोध असला तरी त्या प्रांतातील लोकसमूहांच्या तीव्र भावना बघून पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या शिफारशीनुसार तेलंगणातील पी. व्ही. नरसिंहराव यांच्याकडे आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा ३० सप्टेंबर १९७१ रोजी सोपविली गेली. आंध्र विधानसभेसाठी १९७२ साली झालेल्या निवडणुकीत तेलंगण प्रजा समिती पक्षाने आपले उमेदवार उभे केले परंतु त्यांचा केवळ एकच प्रतिनिधी विधानसभेवर निवडून आला.



राजकीय पातळीवर, स्वतंत्र तेलंगण राज्याच्या निर्मितीस भारतीय जनता पक्षाने १९९०च्या दशकात उघड पाठिंबा व्यक्त केला. तसेच, आपण सत्तेवर आलो तर तेलंगणाचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात येईल असे आश्वासनही त्या पक्षाने दिले. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार केंद्रामध्ये सत्तारूढ असताना झारखंड, उत्तराखंड आणि छत्तीसगड या तीन राज्यांची निर्मितीही २००० साली करण्यात आली. परंतु, राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा घटक असलेल्या तेलुगू देसम पार्टी या मित्रपक्षाचा स्वतंत्र तेलंगण राज्याच्या निर्मितीस विरोध असल्याने तेलंगणाचे वेगळे राज्य तेव्हा अस्तित्त्वात येऊ शकले नाही. पुढे, तेलंगणाचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात यावे आणि हैदराबाद हीच त्याची राजधानी असावी या मागणीचा पाठपुरावा करण्याच्या मुख्य हेतूने के. चंद्रशेखर राव यांनी २००१ साली तेलंगण राष्ट्र समिती या पक्षाची स्थापना केली.

तेलंगणाचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याबाबत काँग्रेस पक्षानेही अनुकूल भूमिका स्वीकारल्याने तेलंगण राष्ट्र समितीने २००४ सालातील आंध्र विधानसभेच्या तसेच लोकसभेच्या निवडणुका काँग्रेस पक्षाबरोबर आघाडी करून लढविल्या. डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्त्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार २००४ साली केंद्रात सत्तारूढ झाले त्यात आघाडीचा एक घटक पक्ष या नात्याने तेलंगण राष्ट्र समितीही सत्तेमध्ये भागीदार होता. तेलंगणाचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या कलमाचा अंतर्भाव त्या सरकारने अंगिकारलेल्या किमान समान कार्यक्रमामध्येही करण्यात आलेला होता. आंध्र प्रदेशात वाय. एस. राजशेखर रेड्डी यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आलेले होते. तेलंगण प्रांत आंध्र प्रदेश राज्यातून वेगळा काढून त्याचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याबाबतच्या प्रस्तावास विरोध करणारा अहवाल राजशेखर रेड्डी यांनी पक्षनेतृत्त्वाकडे धाडताच २००६ सालातील सप्टेंबर महिन्यात तेलंगण राष्ट्र समिती पक्ष संयुक्त पुरोगामी आघाडीमधून बाहेर पडला आणि त्याने सत्तारूढ सरकारला दिलेला पाठिंबाही मागे घेतला. त्या नंतरचा सगळा घटनाक्रम आपल्या डोळ्यांसमोर आहेच. ■■

पुनर्रचना

# व्यथा तेलंगणाची

विदर्भ आणि तेलंगण अशी दोन वेगळी, स्वतंत्र राज्ये निर्माण करण्याबाबतची मागणी पहिल्या राज्य पुनर्रचना आयोगासमोर प्रथमपासूनच मांडण्यात आलेली होती. विकासाच्या प्रक्रियेतील भौगोलिक असमानता हा या मागणीमागील समान दुवा तेव्हाही होता व आजही आहे. मात्र, काळाच्या ओघात या दोन्ही मागण्यांच्या मुख्य 'फोकस'मध्ये अंमळ फरक झाल्याचे जाणवते. सर्वसाधारण आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील उपेक्षा हे विदर्भवासियांचे आजही मुख्य शल्य आहे. विकासाची प्रक्रिया समानतेने राबविण्याच्याबाबतीत उर्वरित महाराष्ट्राकडून आपण आजवर डावलले गेलो आहोत, ही भावना विदर्भाचे वेगळे राज्य मागणा-या समर्थकांमध्ये प्रकर्षाने रु जलेली आहे. खास करू न सिंचन, ऊ र्जाविकास, खनिज पदार्थांचे उत्पादन व वापर, शेती तसेच वनविकास यांबाबत आपल्या प्रदेशाप्रत दुजाभाव दर्शविला जातो, ही विदर्भातील लोकभावना प्रथमपासून आजवर तितकीच सघन राहिलेली दिसते.

तेलंगणाच्याबाबतीत मात्र आजचे चित्र अंमळ वेगळे दिसते. विकासाच्या प्रक्रियेतील असमतोल हे तेलंगण प्रांताचे वेगळे राज्य निर्माण करण्याच्या मागणीमागील आद्य कारण राहिलेले असले तरी स्वतंत्र तेलंगणाचा मुद्दा आज विकासापेक्षाही वा विकासाइतकाच भावनिकही बनलेला आहे, हे वास्तव नाकारता येणारे नाही. स्वतंत्र तेलंगण राज्याच्या निर्मितीचा मुद्दा हा तेलंगणवासियांचे जगणे, भाषा, संस्कृती, साधनसुविधा अशा बहुविध पैलूंशी निगडित असल्याची लोकभावना आज तिथे प्रकर्षाने दिसते. विकासाच्या प्रक्रियेतील प्रादेशिक असमतोल, अनेक दशकांचे मागासलेपण आणि याच्या जोडीनेच उर्वरित आंध्राचा राजकीय तसेच सांस्कृतिक वरचष्मा यांपायी तेलंगणात दाटत असलेल्या तीव्र असंतोषामुळे वेगळ्या तेलंगणाच्या मागणीचा झोत आता विकासाकडून आत्मसन्मानाच्या राजकीय प्रश्नाकडे अधिक झुकलेला दिसतो.



तटवर्ती आंध्र प्रदेश आणि रायलसीमा या दोन प्रांतांबरोबर तेलंगणाचाही समावेश होऊ न १ नोव्हेंबर १९५६ रोजी आंध्र प्रदेश राज्य अस्तित्त्वात आले त्या वेळीही तेलंगणातील संस्कृती ही बहुभाषिक आणि अन्य दोन प्रांतांच्या तुलनेत अधिक 'कॉस्मॉपॉलिटन' होती. उर्वरित आंध्रापेक्षा तिची स्वतःची अशी वेगळी 'आयडेन्टिटी' तेव्हाही होती. एकत्रीकरणानंतर आंध्रातील अन्य दोन प्रांतांमधील नागरिकांचा ओघ तेलंगणाकडे वाहू लागला. हा प्रवाह उत्तरोत्तर अधिकच बळकट होत गेला. ब्रिटिश अमदानीत निर्माण झालेल्या इंग्रजी शिक्षणाच्या सुविधांचा लाभ या स्थलांतरित नागरिकांना अधिक प्रमाणात मिळालेला होता. केवळ इतकेच नाही तर, ब्रिटिश प्रशासनातील सहभागाची परंपरा असल्याने त्यांच्यापाशी प्रशासनिक कौशल्ये व राज्यकारभाराचे ज्ञानही अधिक होते. साहजिकच, राज्यनिर्मितीनंतर निर्माण झालेल्या सरकारी नोकरीच्या संधींचा लाभ या समाजघटकांनी तुलनेने अधिक उठविला. परिणामी, तेलंगणाच्याच केवळ नव्हे तर एकंदरच आंध्रातील सरकारी नोक-यांमध्ये या स्थलांतरितांचे (आंध्रच्या किनारपट्टीचा भाग आणि रायलसीमा या दोन प्रांतांमधून आलेले स्थलांतरित) वर्चस्व निर्माण झाले. स्थलांतरणाच्या बरोबरीनेच तेलंगणात घरबांधणीला वेग आला. स्थानिकांकडून त्यासाठी शेतजमिनी खरेदी करण्याचे पर्व तिथे अवतले. स्थानिक शेतक-यांच्या जमिनी बांधकामांखाली येऊलागल्या. जमिनींची मालकी बदलण्याबरोबरच भू-वापरही बदलू लागला. त्या वेळचे ते लोण आज उभारल्या जात असलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांपर्यंत कायम असलेले दिसते.

या आर्थिक वर्चस्वाला सांस्कृतिक - भाषिक वर्चस्वाचेदेखील अस्तर आहे, असे काही अभ्यासकांचे निरीक्षणवजा प्रतिपादन सांगते. 'आमची तेलुगू भाषा आणि संस्कृती काय तीच खरी', असा श्रेष्ठत्वाचा भाव आंध्राच्या किनारपट्टीतील उच्चभ्रूंच्या मनीमानसी बळकटपणे वसलेला होता. श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाची ही भावना म्हणा वा जाणीव तेलंगणाबाबतच्या त्यांच्या दृष्टिकोनात सातत्यानेच प्रतिबिंबित होत आलेली आहे. तेलंगण ही जणू आपली वसाहतच असल्याची शुद्ध वासाहतिक मनोवृत्ती उर्वरित आंध्रवासियांमध्ये वसत असल्याचे निरीक्षण काही संशोधक मांडतात.

**मुद्दा विकासातील उपेक्षेचा, अससमान वागणुकीचा**

सार्वजनिक खर्च तसेच गुंतवणुकीच्याबाबतीत तेलंगणावर अन्याय होत असल्याची लोकभावना तिथे पूर्वापारच आहे. आंध्राच्या एकंदर उत्पन्नात तेलंगणाची असणारी 'कॉन्ट्रिब्यूशन' घसघशीत असली तरी सार्वजनिक खर्चाचा प्रश्न आला की मात्र तेलंगणाच्या तोंडाला पानेच पुसली जातात, अशी तेलंगणवासियांची तक्रार दिसते. २००३-०४ ते २००६-०७ या कालदरम्यानची आकडेवारी बघणे या संदर्भात उद्‌बोधक ठरावे. विक्री कराच्या माध्यमातून आंध्राच्या तिजोरीत जमा होणा-या एकूण महसुलात तेलंगणाचा सरासरी हिस्सा दिसतो चांगला ७५ टक्क्यांचा. अबकारी कराद्वारे संकलित होणा-या महसुलाची आकडेवारी बघितली तर तेलंगणाचा त्यांतील सहभाग दिसतो ६६ टक्क्यांचा. नाना प्रकारच्या वनौपज जिनसांच्या विक्रीद्वारे राज्य सरकारला मिळणा-या एकंदर उत्पनामध्ये तेलंगणाची 'कॉन्ट्रिब्यूशन' आहे जवळपास ४४ टक्क्यांची. परंतु, लोककल्याणाखातर तेलंगण प्रांतात वेच होणा-या सार्वजनिक पैशाची मात्रा बघितली तर ती मात्र अगदीच दुर्बळ दिसते.

सिंचनाच्याबाबतीत होत असलेली उपेक्षा आणि परवड हे आहे तेलंगणाचे दुसरे शल्य. प्रांतातील अनेक सिंचन प्रकल्प एकतर अर्धवट अवस्थेतच आहेत, काहींची कामे रखडलेली दिसतात तर, काही प्रकल्प हे अपु-या अवस्थेतच सोडून दिलेले आहेत. कृष्णेच्या एकंदर ८०६ दशलक्ष घनफूट पाण्यात तेलंगणाचा वाटा आहे केवळ २६६.८३ दशलक्ष घनफूटांचा. वास्तवात, तेलंगणाचा रास्त देय वाटा आहे ५५२ दशलक्ष घनफूटांचा. वाहत्या नद्यांचे तेलंगणातील जलक्षेत्र आणि लागवडयोग्य जमिनीचे (राज्यातील लागवडयोग्य एकूण जमिनीशी असलेले) प्रमाण ध्यानात घेता तेवढे पाणी तेलंगणाच्या वाट्याला दिले गेले पाहिजे. वस्तुस्थिती अशी आहे की, तेलंगणाला मिळणा-या पाण्याची मात्रा (देय असणा-या पाण्याचा विचार करता) आहे खूपच कमी. गोदावरीच्या एकूण पाणलोट क्षेत्रापैकी तब्बल ७८ टक्के पाणलोट क्षेत्र आजमितीस आहे तेलंगणात. परंतु, डोळ्यांत खुपण्याजोगा विरोधाभास असा की, याच गोदावरीच्या पाण्याचा तेलंगणातील प्रत्यक्ष वापर मात्र आहे किमान !



तळ्यांद्वारे होणारे सिंचन हे तेलंगणाचे पूर्वापार वैशिष्ट्य. तळी - शेततळ्यांच्या माध्यमातून सिंचनाची परंपरेने उत्क्रांत होत आलेली एक प्रणाली तेलंगणात पूर्वीपासूनच व्यवहारात नांदते आहे. ओढे, वहाळ, शेततळी तसेच खुल्या विहिरींमधील पाणी शेतक-याच्या शेतापर्यंत नेण्याची ही व्यवस्था म्हणजे तेलंगणासारख्या अवर्षणप्रवण प्रांताच्या लेखी संजीवनीच जणू. या संदर्भातील १९६० सालासाठीची आकडेवारी बघितली तर, तेलंगणात सिंचनाखाली असलेल्या एकूण क्षेत्रापैकी जवळपास ६२.५ टक्के क्षेत्र या व्यवस्थेद्वारे तेव्हा भिजत असे. आज रोजी हेच प्रमाण घसरलेले दिसते ते अवघ्या १८.६ टक्क्यांवर. ठिकठिकाणच्या तळ्यांच्या देखभालदुरुस्तीकडे सरकारचे झालेले व होत असलेले पूर्ण दुर्लक्ष हे या दुरवस्थेमागील मुख्य कारण. एका पाठोपाठ एक अशा राज्यात सत्तेवर आलेल्या विविध सरकारांनी सार्वजनिक गुंतवणुकीच्याबाबतीत या व्यवस्थेची पूर्ण आबाळ-उपेक्षाच केली. पुरेशा निधीअभावी या यंत्रणेची देखभाल न झाल्याने ही व्यवस्थाच निकामी ठरते आहे.

दुसरीकडे, आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवरील प्रदेशांत सिंचनासाठी कृष्णा तसेच गोदावरी या नद्यांचे पाणी कालव्यांद्वारे खेळविण्याची व्यवस्था तैनात आहे. एकीकडे, तळ्यांद्वारे सिंचनाची तेलंगणातील पूर्वापारची यंत्रणा खिळखिळी होत असताना किनारपट्टीच्या प्रदेशांतील कालव्यांद्वारे सिंचनाची प्रणाली मात्र सुरळीत कार्यरत आहे. कारण या कालव्यांच्या बांधबंदिस्तीससाठी तसेच देखभालदुरुस्तीसाठी पुरेशा सार्वजनिक गुंतवणुकीची तरतूद सरकारकडून बिनबोभाट केली जाते. तेलंगण प्रांतातील लोकसंख्येचे आंध्रातील एकूण लोकसंख्येशी असणारे जे प्रमाण आहे त्या प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात सिंचनासाठी तेलंगणाला अलीकडील काळात निधी उपलब्ध करून दिला जात असला तरी तो पुरेसा ठरत नाही. आंध्राच्या किनारपट्टीवरील प्रदेशांच्या तुलनेत सिंचनाचा एकक खर्च तेलंगणात अधिक आहे, हे या मागील कारण. तेलंगणाचे भौगोलिक स्थानांकन यास कारणभूत ठरते. तेलंगण प्रांत वसलेला आहे तो दख्खनच्या पठारावर. परिणामी, पाणी उचलून उंचावर नेण्यास पंप, पंपासाठी वीज तसेच अन्य आनुषंगिक यंत्रतंत्रसामग्रीसाठी भरभक्कम गुंतवणूक अनिवार्य ठरते.

भरीस भर म्हणून की काय, राज्यात राबविल्या गेलेल्या वा जात असलेल्या शेतीविकासविषयक धोरणांचा सारा भर हा अधिक पाणी पिणाऱ्या पिकांना प्राधान्य देण्याकडे झुकलेला आहे.

**प्रश्न विणकरांचा आणि आदिवासींचाही**

**पुनर्रचना**

# कथा कर्नाटकाची

अ

# निवेदन

'अर्थबोधपत्रिके'मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखनसाहित्य भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना 'पत्रिके'बाबत वाटणा-या आत्मीयतेची, 'अर्थबोधपत्रिके'च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव 'पत्रिके'च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास 'अर्थबोधपत्रिके'साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने 'पत्रिके'च्या प्रारंभापासूनच अतिशय जाणीवपूर्वक आणि कटाक्षाने जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे 'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

## प्रमुख संदर्भ

**(A) Magazines** : - (1) Nature Vol 468, 25 November 2010 (2) New Statesman, 13 September 2010 (3) Appropriate Technology, Vol 37, No. 3 (4) New Scientist, 16 October 2010

**(B) Books/Reports -** (1) Regional Disparities, Smaller States and Statehood for Telangana, C.H. Hanumantha Rao, Academic Foundation, New Delhi, 2010 (2) Summaries of judgements, Advisory Opinions and Orders of the International Court of Justice

**(C) Websites** : - (1)www.sciencedaily.com/releases (2) www.nature.com/news(3)http://news.bbc.co.uk(4) www.joshuaproject.net (4) http://english.pravda.ru/society/stories (5)www.veteranstoday.com (6) www.globalpost.com ■■

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अ‍ॅन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.



भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन
आता पुनर्मुद्रित स्वरूपात

भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज

**Poverty in India**

लेखक

वि.म. दांडेकर नीळकंठ रथ

पृष्ठे १४० किंमत : २००/- रुपये

अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ

'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन**

*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*

# कर्ता-करविता

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रु पये

**ग्रंथ घेणा-यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**